सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

**क्रमांक : सीएमए-०४२६/प्र.क्र४२/२०२६/जाहिरात** **दिनांक :- ०९ सप्टेंबर, २०२६**

## -: शुद्धीपत्रक :-

**महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२६ जाहिरात क्रमांक ०१७/२०२६ दिनांक २५ जून, २०२६ परीक्षेच्या आयोजनाबाबत**

शासनाच्या विविध विभागांतील गट-क संवर्गातील पदे भरण्यासाठी आयोगामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ संदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १६ जुलै, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकाद्वारे सदर परीक्षा दिनांक २५ ऑक्टोबर, २०२६ रोजी प्रचलित पद्धतीने (Offline OMR आधारित) घेण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते.

**२**. सदर परीक्षेच्या आयोजनाच्या अनुषंगाने राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये परीक्षा उपकेंद्रांची उपलब्धता, स्थानिक परिस्थिती, वाहतूक व्यवस्था, परीक्षार्थीना परीक्षा केंद्रांवर वेळेत व सुरक्षितपणे पोहोचता येण्याची शक्यता तसेच परीक्षा सुरळीत, शांततापूर्ण व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय बाबींचा आयोगामार्फत सर्वकष विचार करण्यात आला आहे. काही जिल्ह्यातील परीक्षा आयोजनाबाबत संबंधित जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झालेले अहवाल, राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०२६, सणासुदींचा कालावधी, इतर भरतीसंस्थांच्या परीक्षांचे वेळापत्रक, हिवाळी अधिवेशन इत्यादी बाबींचा विचार करून **महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ ही परीक्षा दिनांक २५ ऑक्टोबर, २०२६ ऐवजी आता दिनांक ०३ जानेवारी, २०२७ रोजी सर्व जिल्हा केंद्रांवर आयोजित करण्यात येणार आहे.** परीक्षेच्या तारखेतील बदलाबाबत सर्व संबंधित परीक्षार्थीनी नोंद घ्यावी.

**३**. परीक्षेचे केंद्र, प्रवेशपत्र, परीक्षेची वेळ, परीक्षा केंद्रनिहाय आवश्यक सूचना तसेच इतर बाबींबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल. परीक्षार्थीनी आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरील सूचना नियमितपणे पाहाव्यात.

(विवेक देशमुख)
उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : नवी मुंबई